माहे जानेवारी २०२६ ते माहे डिसेंबर २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम..

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**

आदेश क्रमांक:-ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/ई-१४०९६२३/पं.रा.-२
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक :-१७/०२/२०२६

**संदर्भ**- (१) सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २२ , दिनांक ११ मार्च, २०२२
(२)राज्य निवडणूक आयोगाचे क्र:रानिआ/ग्रापंनि-२०२५/सं.क्र.६५८/का.८, दि.१६/१०/२०२५ व दिनांक ०४/०२/२०२६

*ज्याअर्थी,* महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २२ अन्वये कलम १० मधील सुधारीत केलेल्या तरतुदीनुसार :-

१. *आणि ज्याअर्थी,* राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक:रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का.०५, दि. २७/०१/२००५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाही;

२. *आणि ज्याअर्थी,* माहे जानेवारी २०२६ ते माहे डिसेंबर २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती तसेच नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या निवडणूकांसाठी प्रभाग रचना करण्याबाबतच्या कार्यवाहीस तात्काळ सुरुवात करावी लागणार आहे;

३. *आणि ज्याअर्थी,* ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या प्रभाग रचना करण्याबाबतच्या कार्यवाहीस तात्काळ सुरूवात करावी लागणार आहे;

४. *त्याअर्थी,* महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० मधील पोटकलम खंड (ब) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायतींचे प्रभाग रचना करणे याकरीता राज्य शासन खालील आदेश देण्यात येत आहेत :-

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम**

| अ.क्र. | प्रभाग रचना कार्यक्रमाचा टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | <u>प्रारुप प्रभाग रचना तयार करणे</u> | |
| १ | i) तहसिलदार यांनी गुगलअर्थ चे नकाशे super impose करुन प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे | २०/०२/२०२६ |
| | ii) संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे. | २७/०२/२०२६ |
| | iii) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रारुप प्रभागरचनेची तपासणी करणे. सदर समितीमध्ये गटविकास अधिकारी व संबधित मंडळ अधिकारी यांचा समावेश असेल. | ०५/०३/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| | iv) सदर समितीने **प्रारुप प्रभाग रचनेचा** प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करणे. | ११/०३/२०२६ |
| | v) जिल्हाधिकारी यांनी **नमुना ब (प्रारुप प्रभाग रचना)** ची संक्षिप्त तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करून सदर प्रारूप राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करणे | १७/०३/२०२६ |
| | vi) राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी यांनी आवश्यक असल्यास प्रस्तावात दुरूस्ती करणे व त्यास मान्यता देणे | २३/०३/२०२६ |
| | vii) या दुरुस्त्या अंतर्भूत करुन प्रारुप प्रभाग रचना तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता द्यावी व समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करावी. | ३०/०३/२०२६ |
| | **प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे** | |
| २ | i) प्रारुप प्रभाग रचनेला ( नमुना ब) व्यापक प्रसिध्दी देऊन तहसिलदार यांनी हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | ०७/०४/२०२६ |
| | ii) प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३/०४/२०२६ |
| | iii) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे | १६/०४/२०२६ |
| | iv) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | २१/०४/२०२६ |
| | v) आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | २३/०४/२०२६ |
| | **प्रभाग रचना अंतिम करणे** | |
| ३ | i) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना अंतिम करुन राज्य निवडणूक आयोगास सादर करणे | २८/०४/२०२६ |
| | ii) राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या अंतिम प्रभाग रचनेला जिल्हाधिकारी यांनी (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | ०४/०५/२०२६ |

(वर्षा भरोसे)
सह सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत-माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१.सर्व विभागीय आयुक्त

२.सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

३.उप सचिव,राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रत:- कार्यासन पं.रा.२, निवडनस्ती.